महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय् खलनिग्रहणाय्

पुणे शहर पोलीस

# दर्पण

जानेवारी २०२०

# उत्कृष्ट कार्य

उत्कृष्ट कार्य

**PuneMirror** - 3 January, 2019

# Cops save auto driver having a heart attack

## They rushed him to Sassoon hospital in auto with siren blazing on one of their bikes

Gunwanti.Paraste
@timesgroup.com
TWEET @gunwantimirror

Cops attached to Koregaon Park traffic unit had an unusual visitor a few days ago. Ashok Rajaram Wadekar, a 60-year-old auto rickshaw driver, walked up to Vinod Kaygude, Maninath Bhagwat and Rahul Dhamdhere, who were manning traffic at Wadia junction, with folded hands. It took them a minute to recognise him. They had apparently saved his life three months ago and he had come only to thank them.

The incident dates back to October 30, 2019, when Wadekar was out looking for commuters in Kalyaninagar. "I had just taken in a passenger for Jehangir Hospital. We were on our way when I started feeling extremely uneasy. I requested the passenger to take another auto, as I was in no position to drive further. She agreed and got off. My condition was only getting worse by the second," said Wadekar.

A few minutes later, while Wadekar was still waiting at the spot, another passenger walked up to his auto and asked to be taken to Kalyaninagar. He briefly narrated his condition and asked for the commuter's phone to get in touch with his son. "The man was kind enough to allow me to use his phone. I called my son and asked him to rush to me immediately. But he was in the Chaturshrungi area at that time. I knew it would take him minimum of 45 minutes considering the peak hour traffic. I felt so helpless at that point of time," narrated Wadekar.



Wadekar was saved by traffic cops Kaygude, Bhagwat, Dhamdhere

Just when he thought, he wouldn't make it, he saw three constables walk past his vehicle. He nudged one of them and gestured that he needed help. The cops, who were manning traffic at congested Wadia junction, did not take a second to do what they thought was the right thing to do.

The next thing Wadekar remembers is being rushed into another auto to Sassoon General Hospitals. While two constables got in with him in the auto, the third mounted his bike that had a siren and paved the way for the makeshift ambulance. Once at the hospital, staff insisted that they fill out all the paperwork before treating Wadekar. Once again, cops used their presence of mind and insisted that the auto driver be treated without any delay. On seeing Wadekar's condition, hospital staff realised that time was of essence and shifted him to the intensive care unit.

Wadekar had multiple blockages in his heart. His blood pressure had also shot up. For the next three months, he underwent treatment at the hospital. In December, he was discharged and advised bed rest for a couple of weeks. As soon as Wadekar was up on his feet, he decided to pay a visit to his saviours.

"For me, they are not traffic cops but Brahma, Vishnu and Mahesh. They just dropped everything to rush a commoner like me to the hospital. They even got the hospital to treat me without completing all the paperwork. Had it not been for them, I wouldn't be alive today," said a grateful Wadekar.

The cops, on their part, simply brushed aside all the praise showered by Wadekar. "He was in a bad shape. When he gestured for help, we figured that something was terribly wrong with him. We had to choose between helping him and manning the busy junction. In flash of a second, all three of us took a call that we will take him to the hospital and rush back to control traffic. We just did what any citizen should do to help those in need. It is no big deal," said Kaygude, as the other two of his colleagues nodded in agreement.

**सामना** – दि. ३० जानेवारी, २०२०



# महिला सुरक्षिततेबाबत पुणे पोलिसांचे काम कौतुकास्पद!

पुणे, दि. २९ (प्रतिनिधी) – राज्य शासनाकडून महिलांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात आले असून, पुणे पोलिसांच्या सेवा उपक्रमासह 'भरोसा सेल'मुळे शहरातील महिलांसह नागरिकांना दिलासा मिळाला आहे. पोलिसांच्या विविध उपक्रमांमुळे महिलांसह ज्येष्ठ नागरिकांना फायदा झाला आहे. पोलिसांच्या टीमवर्कमुळे त्यांना लोकांचे आशीर्वाद मिळत आहेत, अशा शब्दांत गृह (शहरे) मंत्री सतेज ऊर्फ बंटी पाटील यांनी पुणे पोलिसांच्या सेवा उपक्रमासह 'भरोसा सेल'च्या कामगिरीचे कौतुक केले.

पोलीस आयुक्तालयात 'भरोसा सेल'सह सेवा उपक्रमाची त्यांनी नुकतीच माहिती घेतली. यावेळी पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम्, पोलीस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, अप्पर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, पोलीस उपायुक्त बच्चन सिंह, 'भरोसा सेल'च्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजया कारंडे उपस्थित होत्या.

सेवा उपक्रमामुळे शहरातील विविध पोलीस ठाण्यांतर्गत नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने उपाययोजना केल्या जात आहेत. तक्रारीनंतर दोन दिवसांत पोलिसांकडून नागरिकांना प्रतिसाद दिला जात आहे. त्यामुळे अनेक कुटुंबीयांना फायदा झाल्याने त्यांच्याकडून पोलिसांचे कौतुक केले जात आहे.

तसेच, 'भरोसा सेल'मुळे ज्येष्ठ नागरिकांसह महिलांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांचा पुणे पोलिसांवर विश्वास वाढला आहे. शहरातील प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवांबद्दल नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे. पुणे पोलिसांच्या विविध उपक्रमांसह प्रत्येक विभागातील टीममुळे नागरिकांमध्ये पुन्हा विश्वास निर्माण झाला आहे. त्यामुळे पोलिसांच्या टीमला सॅल्यूट करीत पाटील यांनी कौतुक केले.

**केसरी** – दि. १८ जानेवारी, २०२०




महाराष्ट्र राज्य पोलिस नेमबाज स्पर्धेत पदक मिळवणाऱ्या पोलिसांचा आयुक्त डॉ.के. व्यंकटेशम् यांच्या ह
सत्कार करण्यात आला. या स्पर्धेत हवालदार राजेंद्र पाटील यांनी बेस्ट पिस्टल शुटर व बेस्ट एम पी-
शुटर या दोन्ही स्पर्धेत ट्रॉफी मिळवली. सुनिल पवार यांनी रायफल ३०० गज प्रकारात कांस्य तर,
पोलिस नाईक अमोल नेवसे यांनी रायफल ३०० मीटर थ्री पोझीशन या प्रकारात रौप्यपदक मिळवले.
महिला पोलिस नाईक पूनम लाड यांनी रायफल १०० गज स्टँडींग प्रकारात सुवर्ण पदक पटकावले.

सामना – दि. ८ जानेवारी, २०२०

# शहरातील गुन्हेगारीला लगाम घालण्यात यश

## मागील वर्षीच्या तुलनेत गुन्ह्यांची संख्या ८७९ने घटली ▮ ६८ टक्के गुन्हे उघडकीस

पुणे, दि. ७ (प्रतिनिधी) – पुणे पोलिसांच्या कामगिरीमुळे शहरातील गुन्हेगारीला लगाम बसला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत २०१९ मध्ये गुन्ह्यांची संख्या ८७९ ने घटली आहे. खून व खुनाचा प्रयत्न आणि सदोष मनुष्यवधातील गुन्ह्यांसह दरोड्याची तयारी, बलात्कार, विनयभंग, अमलीपदार्थ विक्री, जुगार, दंगा, फसवणूक जबरी चोरीचे बहुतांश गुन्हे उघडकीस आणले आहेत. मालमत्ताविषयक गुन्हे उघडकीस येण्याची आकडेवारी ४० टक्के असून घरफोड्या, दुचाकी चोरांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे, अशी माहिती पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी पत्रकार परिषदेत दिली.



शहरात २०१८ वर्षीच्या तुलनेत २०१९ मध्ये घडलेल्या गुन्ह्यांची माहिती देण्यासाठी पोलीस आयुक्तालयात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. यावेळी सहपोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, पोलीस उपायुक्त बच्चन सिंह उपस्थित होते.

डॉ. व्यंकटेशम म्हणाले, शहरात २०१९ मध्ये विविध पोलीस ठाण्यांतर्गत ८ हजार ६७७ गुन्ह्यांची नोंद झाली होती. त्यापैकी ५ हजार ९२९ गुन्ह्यांची उकल करण्यात यश आले होते. तर २०१८ मध्ये गुन्ह्यांची संख्या ९ हजार ५५६ एवढे होते. त्यामध्ये गतवर्षीच्या ८७९ ने घट झाली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत शहरातील गुन्हेगारी ९ टक्क्यांनी कमी झाली आहे. तर २०१८ मध्ये १ हजार ९६६ वाहने चोरीला गेली होती. तुलनेत यंदा वाहन चोरीचे गुन्हे २९० ने कमी झाले आहे. तसेच वाहन चोरी रोखण्यासाठी ज्या भागातून वाहने चोरीला जातात, अशा ठिकाणी संबंधित विभागातील पोलिसांनी लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. पीएमपीएल बसस्थानकांसह एसटी स्थानकातील चोरट्यांना पकडण्यासाठी विशेष प्राधान्य देणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

### वर्षभरात दाखल गुन्हे

| गुन्हे | दाखल | उघड |
|---|---|---|
| खून | ७४ | ७१ |
| खुनाचा प्रयत्न | १२१ | १२० |
| शरीराविरुद्ध गुन्हे | १२७५ | १२२५ |
| दंगा | १५५ | १५२ |
| व्यावसायिक दरोडा | ३ | २ |
| दरोड्याची तयारी | १४ | १४ |
| जबरी चोरी | २२१ | १७४ |
| इतर जबरी चोरी | १५७ | १३२ |
| सर्व चोरी | ३०७५ | १०७५ |
| साखळीचोरी | ६४ | ४२ |
| वाहनचोरी | १६७८ | ५४६ |
| दिवसा घरफोडी | १०८ | ६४ |
| रात्री घरफोडी | ३५२ | १९३ |

### बलात्कार, विनयभंगाच्या बहुतांशी गुन्ह्यांची उकल

▮ सन २०१८च्या तुलनेत २०१९ मध्ये बलात्काराच्या घटनेत १५ने घट झाली आहे. यंदा बलात्काराच्या २२४ गुन्ह्यांपैकी २२२ गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे. विनयभंगाचे प्रमाण ९८ने कमी झाले असून, दाखल ४१९ गुन्ह्यांपैकी ४०९ ची उकल केली आहे. विनयभंग तसेच बलात्काराच्या गुन्ह्यांमधील आरोपी एकमेकांच्या ओळखीचे असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिसांकडून सर्वतोपरी प्राधान्य दिले जात आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्याविरुद्ध कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. नागरिक, महिला, मुली, विद्यार्थी, नोकरदार, उद्योजक, व्यापाऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. विशेषतः दुचाकी चोरी, खून, घरफोड्यांच्या घटनांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही तक्रारीसाठी पोलीस नियंत्रक कक्ष, पोलीस ठाणे, पोलीस चौकी परिसरात दिलेल्या प्रत्येक तक्रारींची दखल घेतली जाणार आहे.

▮ डॉ. के. व्यंकटेशम, पोलीस आयुक्त

सामना – दि. १७ जानेवारी, २०२०

# दामिनी पथकामुळे गतिमंद मुलगी पालकांच्या स्वाधीन


पुणे, दि. १६ (प्रतिनिधी)– नारायण पेठेतील घरातून पालकांची नजर चुकवित घराबाहेर येऊन दत्तवाडीतील इंदिरा उद्यानाजवळील सोसायटीच्या लिफ्टमध्ये बसलेल्या एका गतिमंद मुलीची दत्तवाडी दामिनी पथकाने समजूत काढून तिला पालकांच्या ताब्यात दिले.

वेदवती बर्वे (वय २०, रा. नारायण पेठ) असे पालकांच्या ताब्यात दिलेल्या मुलीचे नाव आहे.

दामिनी पथकाने दिलेल्या माहितीनुसार, दोन दिवसांपूर्वी दत्तवाडीत दामिनी मार्शल पेट्रोलिंग करीत होते. त्यावेळी विजयनगरमध्ये इंदिरा उद्यानाजवळील एका सोसायटीच्या लिफ्टमध्ये मुलगी बसली असून, ती खाली उतरत नसल्याची माहिती पोलीस नियंत्रण कक्षातून मार्शलला मिळाली. त्यानुसार दामिनी मार्शल श्वेता कदम आणि स्वाती डुकरे यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी वेदवतीची समजूत काढून वारंवार विचारपूस करून मोबाईल क्रमांक मिळविला. दामिनी पथकाने संबंधित क्रमांकावर फोन लावून मुलीची माहिती सांगत वेदवतीला राहण्याचे ठिकाण विचारले. अखेर, पत्ता मिळाल्यानंतर दामिनी पथकातील कदम आणि डुकरे यांनी वेदवतीला तिच्या आईच्या ताब्यात दिले.

सकाळ – दि. २० जानेवारी, २०२०

# CSI's Award of Recognition to Pune police for 'Third I' proj




**PROUD MOMENT:** Computer Society of India giving 'Award of Recognition' to Pune city police for their project 'Third I – Enhancing Policing, Preventing Crimes through Digital Technologies'.

■ ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**PUNE:** The Pune city police have received 'Award of Recognition' from the Computer Society of India (CSI) for their project 'Third I – Enhancing Policing, Preventing Crimes through Digital Technologies'.

The CSI SIG E-Governance Awards 2018-19 were held for projects under different categories.

The certificates were awarded during a ceremony in Bhubaneshwar, Odisha, on January 17.

With the help of Adivid Technologies Pvt Ltd, Commissioner of Police Dr K Venkatesham has started the 'Third I' project which helps in analysis of various crimes as well as understand the modus operandi of criminals.

All police inspectors and detection branch staff of police stations have been given access to this online system to feed details of the crimes.

**पुढारी – दि. २८ जानेवारी, २०२०**



सहाय्यक पोलिस आयुक्त मच्छिंद्र चव्हाण यांच्या हस्ते मूळ मालकांना मोबाईल देण्यात आले.

# मुद्देमाल मूळ मालकांना परत

**कोथरूड : पुढारी वृत्तसेवा**

कोथरूड पोलिस स्टेशन हद्दीतील प्रॉपर्टी मिसींगमधील एकूण १,१०,००० रुपये किमतीचे ८ मोबाईल शोधले, ते सहायक पोलिस आयुक्त मच्छिंद्र चव्हाण यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनी मूळ मालकांकडे सुपूर्द करण्यात आले.

सदरची कारवाई परिमंडळ ३ च्या पोलिस उपायुक्त पौर्णिमा गायकवाड, सहाय्यक पोलिस आयुक्त कोथरूड विभाग मच्छिंद्र चव्हाण, वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रतिभा जोशी, पोलिस निरीक्षक(गुन्हे) किरण बालवडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक विकास बाबर, पोलिस उपनिरीक्षक चंद्रकांत कामठे व कर्मचारी यांनी केली. मुद्देमाल मूळ मालक घेत असताना त्यांच्या चेहऱ्यावर आलेले समाधान आम्हाला काम करण्यास प्रेरणा देत असते अशी भावना यावेळी पोलिसांनी व्यक्त केली.

**पुढारी – दि. ८ जानेवारी, २०२०**

# दाखल ३१ गुन्ह्यांतील दोन कोटींचा ऐवज तक्रारदारांना परत

**पुणे : प्रतिनिधी**

शहरातील विविध पोलिस ठाण्यात दाखल ३१ गुन्ह्यांत सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम, मोबाईल फोन, वाहने असा सर्व मिळून २ कोटी २ लाखांचा मुद्देमाल तक्रारदारांना परत करण्यात आला आहे. तसेच सायबर गुन्ह्यांत १ कोटी १ लाख ६० हजार ७२१ रुपये तक्रारदारांना परत करण्यात आले आहेत.

> • सायबर गुन्ह्यांत एक कोटी १.५ लाख रुपये तक्रारदारांना परत

पोलिस आयुक्त के. व्यंकटेशम पोलिस आयुक्त रवींद्र शिसवे, अप्पर पोलिस आयुक्त अशोक मोराळे, अप्पर पोलिस आयुक्त सुनील फुलारी, पोलिस उपायुक्त बच्चन सिंह, सुहास बावचे यांच्या उपस्थितीत गुन्ह्यातील फिर्यादींना त्यांचा ऐवज आणि रक्कम परत करण्यात आला. यावेळी पोलिस अधिकारी, कर्मचारी तसेच तक्रारदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

१० ऑगस्ट २०१९ रोजी ६१ गुन्ह्यातील १ कोटी १८ लाख ७० हजार १०० रुपयांचा मुद्देमाल, २७ सप्टेंबर रोजी ९१ गुन्ह्यातील १ कोटी ४४ लाख ४४ हजार ३७८ रुपयांचा मुद्देमाल व २२ नोव्हेंबर रोजी ७० गुन्ह्यातील १ कोटी १७ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल तक्रारदारांना परत करण्यात आला. आतापर्यंत सुमारे १५ कोटी रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करून परत करण्यात आला आहे. मंगळवारी परिमंडळ पाच येथे १३ गुन्ह्यातील १ कोटी ६३ लाख ११ हजारांचा मुद्देमाल परत करण्यात आला आहे.

मार्केट यार्ड पोलिस ठाण्यातील अपहरण व खंडणीच्या गुन्ह्यातील रोख रक्कम १ कोटी ५१ लाख रुपये मिळवून दिल्याप्रकरणी सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या मार्केट यार्ड पोलिस ठाण्याचे पोलिस हवालदार श्रीकांत कसलकर, अलंकार पोलिस ठाण्याचे पोलिस हवालदार आर. जी. मुंढे, डेक्कन पोलिस ठाण्याचे हवालदार व्ही. जे. बाबर यांचा गौरव करण्यात आला.

Sakal Times - 9 January, 2020

# Avg 5 days taken for passport verification

MUBARAK ANSARI
@VictrForceGhazi

**PUNE:** The average time taken for police verification report (PVR) of the passport was five days in 2019, revealed the annual report of Pune city police. The police officials said it is one of the best averages in the country as the stipulated time for verification is 21 days.

In 2018, the police processed 1.97 lakh passport verifications and the number dropped to 1.33 lakh in 2019. Since August 15, 2018, Hinjawadi and other Pimpri-Chinchwad areas were separated from the jurisdiction of Pune city police.

Commissioner of Police Dr K Venkatesham told Sakal Times, "Things like process engineering, technology, training of the staff members have reduced the average time. Process engineering means only a few documents are required and the flow of documents has been streamlined which are being sent online. The staff members have been trained on the usage of technology which has made the work hassle-free."



**WORK MODE:** A policeman working at passport branch of Shivajinagar police station on Wednesday. RAJIV ARORA

According to the officials, after an applicant applies for the passport, the details are sent to the Passport Seva Kendra (PSK) in Mundhwa, where the first step verification of the applicant is done. Their biometric details are taken and documents checked. Then the details are sent to the local police station whose staff armed with a tablet goes to the applicant's house to physically verify the details. All the details are shared online between the passport office and the police department. Earlier, hard copies of the documents were sent from one office to another which also delayed the process.

Regional Passport Officer (RPO), Pune, Anant Takwale told Sakal Times, "The PSK has helped in streamlining the whole process which has helped in reduction of time taken for verification. Though the stipulated period is 21 days, in Maharashtra most districts are taking an average of 10 days while in Pune it is five days or sometimes less than that also."

**लोकमत** – दि. ४ जानेवारी, २०२०

## मृतांची संख्याही झाली कमी : वाहतूक पोलिसांकडून विविध उपक्रम

# सीसीटीव्ही अन् कारवाईमुळे सलग तिसऱ्या वर्षी घटले अपघात

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : अपघात रोखण्यासाठी करण्यात आलेल्या विविध उपाययोजनांमुळे शहरातील अपघातांचे प्रमाण सलग तिसऱ्या वर्षी कमी झाले आहे. २०१७ मध्ये जीवितहानी झालेल्या अपघातांची संख्या ३६० एवढी होती. त्यानंतर मागील दोन वर्षांत अनुक्रमे २४० व १९९ पर्यंत घट झाली आहे. त्यामुळे अपघातातील मृतांची संख्याही त्याच प्रमाणात खाली आली आहे. एकूण अपघातांमध्ये तीन वर्षांत जवळपास निम्म्याने घट झाल्याचे चित्र आहे. वाहनचालकांवर सीसीटीव्हीची नजर, वाहतूक नियमांमुळे जनजागृती आणि कारवाईमुळे वाहनचालक नियमात वाहने चालवित आहेत. परिणामी अपघात कमी होत आहेत.

मागील काही वर्षांत शहरातील वाहनांची संख्या झपाट्याने वाढत गेली. ही संख्या जशी वाढत गेली, तसे अपघातांचे प्रमाणही वाढले. वाहतुकीचा वेग मंदावला असला तरी बेशिस्तपणा वाढत गेला. अनेक वाहनचालक सर्रासपणे वाहतुकीचे नियम मोडत असल्याचे दृश्य सर्वच रस्त्यांवर पाहायला मिळते. अनेक रस्त्यांची अवस्थाही फारशी चांगली नाही. या विविध कारणांमुळे शहरात दररोज अपघात घडतात. त्यातील काही अपघात गंभीर स्वरूपाचे असून अनेकांचा मृत्यू होत आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, २०१९ मध्ये डिसेंबरअखेरपर्यंत एकूण १९९ मोठे अपघात झाले. त्यामध्ये २०६ जणांचा मृत्यू झाला. २०१८ मध्ये हा आकडा अनुक्रमे २४० व २५३ एवढा होता. तर २०१७ मध्ये ३६० जीवघेणे अपघात झाले होते. मागील तीन वर्षांच्या आकडेवारीवरून या अपघातांचे प्रमाण घटत असल्याचे स्पष्टपणे दिसते.

शहरात २०१७ मध्ये एकूण १५०७ अपघात झाले होते. त्यापैकी सर्वाधिक ६०७ अपघात गंभीर स्वरूपाचे असून त्यामध्ये ७२० जणांना गंभीर स्वरूपाची दुखापत झाली. या अपघातांचा आकडा २०१८नंतर जवळपास निम्म्याने कमी झाला. किरकोळ स्वरूपाच्या अपघातांमध्येही लक्षणीय घट झाली आहे. वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी पोलिसांनी केलेल्या विविध उपाययोजनांमध्ये अपघातांचे प्रमाण कमी झाल्याचे पोलीस आयुक्त के. व्यंकटेशम यांनी नुकतेच एका पत्रकार परिषदेत सांगितले आहे.

## रस्ते सुरक्षेचे सातत्याने धडे : हेल्मेट कारवाईचाही परिणाम



1. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर सीसीटीव्हीच्या माध्यमातून वाहतूक पोलिसांकडून कारवाई केली जात आहे.
2. रस्ते सुरक्षेसंदर्भात सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. नियमांचे पालन करणाऱ्या चालकांसाठी प्रोत्साहन योजना सुरू करण्यात आल्या असून, त्याला चांगला प्रतिसादही मिळत आहे.
3. हेल्मेट कारवाईमुळे हेल्मेट वापरणाऱ्यांची संख्या वाढली आहे. त्यामुळे अपघातांचे प्रमाण कमी होण्याबरोबरच जीवितहानीचे प्रमाणही घटले आहे.

### शहरातील सर्व प्रकारच्या अपघातांची स्थिती

| अपघात | वर्ष | | |
|---|---|---|---|
| | २०१७ | २०१८ | २०१९ |
| जीवघेणे अपघात | ३६० | २४० | १९९ |
| मृत्यू | ३७३ | २५३ | २०६ |
| गंभीर अपघात | ६०७ | ३८१ | ३४५ (नोव्हें. पर्यंत) |
| गंभीर जखमी | ७२० | ४६६ | ४१० |
| किरकोळ अपघात | ३५८ | १०८ | १२७ (नोव्हें. पर्यंत) |
| जखमी | ४४१ | २२५ | १४६ |
| जखमी नसलेले अपघात | १८२ | ९२ | ६० (नोव्हें. पर्यंत) |
| एकूण अपघात | १५०७ | ८९१ | ७३१ |


### मागील तीन वर्षांतील जीवितहानी झालेल्या अपघातांची स्थिती

| महिना | वर्ष २०१७ | | वर्ष २०१८ | | वर्ष २०१९ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अपघात | मृत्यू | अपघात | मृत्यू | अपघात | मृत्यू |
| जानेवारी | ४० | ४० | २४ | २७ | १५ | १५ |
| फेब्रुवारी | २३ | २४ | १६ | १६ | २५ | २६ |
| मार्च | २६ | २७ | २७ | २९ | २० | २० |
| एप्रिल | २४ | २६ | २० | २० | ९ | ९ |
| मे | ३३ | ३३ | १५ | १६ | १५ | १७ |
| जून | ३२ | ३३ | २० | २१ | ९ | १० |
| जुलै | ३५ | ३५ | १६ | १८ | ११ | १२ |
| ऑगस्ट | २२ | २४ | २२ | २३ | १६ | १६ |
| सप्टेंबर | २४ | २५ | १८ | १९ | ११ | ११ |
| ऑक्टोबर | ३२ | ३२ | २६ | २६ | १५ | १६ |
| नोव्हेंबर | ३७ | ३८ | २० | २१ | ३२ | ३३ |
| डिसेंबर | ३२ | ३६ | १६ | १७ | १३ | १३ |
| एकूण | ३६० | ३७३ | २४० | २५३ | १९९ | २०६ |

TIMES OF INDIA - 8 January, 2020

# Major dip in chain-snatching & robbery cases in one year

## Police Data Show 9% Fall In Serious Crimes In '19




## 2.2k more cyber offence plaints registered in Pune

केसरी – दि. १० जानेवारी, २०२०

# वाहतूक शाखेकडून आतापर्यंत १०० ग्रीन कॉरिडॉर

**गजानन शुक्ला**

पुणे : देशभरात घटणाऱ्या प्राणांतिक अपघाताची संख्या मोठी आहे. या अपघातात ब्रेनडेड होणाऱ्यांचे हृदय, मूत्रपिंड, डोळे, यकृत आदी अवयव दान करण्याच्या योग्यतेचे असतात. अनेक वेळा हे अवयव इतर शहरातील रुग्णासाठी उपयोगाचे असतात. हे अवयव गरजूंपर्यंत कमी वेळेत पोहचविणे गरजेचे असते. अशा वेळी वाहतूक पोलिस सदर मार्गावर ग्रीन कॉरिडॉर तयार करतात. चार वर्षात पुणे पोलिसांच्या वाहतूक शाखेने ११३ वेळा ग्रीन कॉरिडॉर तयार करून अनेक रुग्णांना जीवदान दिले.

ग्रीन कॉरिडॉर तयार करणे हे जिकरीचे काम असते. राज्यातील इतर शहरातून अवयव येणार असेल तर विमानतळ ते रुग्णालय असा ग्रीन कॉरिडॉर तयार करावा लागतो. तर काही वेळा दोन शहरातील अंतर कमी असेल तर पूर्ण मार्गावर रुग्णवाहिकेसाठी ग्रीन कॉरिडॉर तयार करावा लागतो. त्या रस्त्यावरील वाहतुकीचा सर्व अभ्यास करून हा मार्ग तयार करण्यात येतो. रस्त्यावर जागो जागी वाहतूक पोलिस उभे करण्यात येतात. जवळचा मार्ग निवडण्यात येतो. यात रुग्णवाहिकेच्या मागे पुढे पोलिसांची मोटारी असते. आता पर्यंत वाहतूक शाखेच्या वतीने सुमारे १०० वेळा शहरात विविध भागात ग्रीन कॉरिडॉर तयार करण्यात आले आहे. शहरात पहिल्यांदा ऑगस्ट २०१५ मध्ये ग्रीन कॉरिडॉर तयार करण्यात आला होता. शहरातील विविध रुग्णालय बाहेरील जिल्ह्यातून अथवा बाहेर जिल्ह्यातील रुग्णालयात ब्रेनडेड रुग्णांचे अवयव दान करतात. हे अवयव प्रत्यारोपण करीत अचानकपणे



ने-आण करीत असतात. अशा वेळी रुग्णालय हे पुणे शहर पोलिस आयुक्तालय व वाहतूक शाखेच्या मुख्य नियंत्रक कक्षास कळवितात. अशावेळी वाहतूक शाखेकडून अवयव इच्छितस्थळी ने-आण करण्यासाठी ग्रीन कॉरिडॉर तयार करून रुग्णवाहिकेला कमीत कमी वेळेत कुठलाही अडथळा न आणता इच्छितस्थळी वेळेत पोहचविले जाते. आतापर्यंत सुमारे १०० वेळा ग्रीन कॉरिडॉर तयार करण्यात आले असल्याची माहिती वाहतूक शाखेचे अप्पर पोलिस आयुक्त डॉ. संजय शिंदे यांनी दिली. डॉ. आरती गोखले म्हणाल्या, प्रत्यारोपण वेळी वेळेची फार मर्यादा असते. २०१५ पासून ग्रीन कॉरिडॉरसाठी पुणे पोलिसांची फार मोठी मदत झाली आहे. याचा अनेक रुग्णांना फायदा झाला आहे.

जानेवारी महिण्यात शेवाळवाडी फाटा ते दीनानाथ मंगेशकर हॉस्पीटल हे अंतर अवघ्या २२ मिनीटात ग्रीन कॉरिडॉर तयार करून पार केले तर दुसरा शिंदेवाडी ते सह्याद्री हॉस्पीटल असा दुसरा ग्रीन कॉरीडोर २५ मिनीटात पूर्ण केला आहे.

सामना – दि. २१ जानेवारी, २०२०

# पासपोर्ट पडताळणीतही पुणे पोलीस अव्वल

## वर्षभरात तब्बल १ लाख ३४ हजार पासपोर्टला हिरवा कंदील

नवनाथ शिंदे ■

पुणे – शहरातील नागरिकांच्या पासपोर्ट पडताळणीसाठी पुणे पोलिसांनी गगनभरारी घेतली आहे. देशासह राज्यातील इतर शहरांच्या तुलनेत पुण्यात अवघ्या पाच दिवसांत पासपोर्टचे व्हेरिफिकेशन केले जात आहे. त्यामुळे नोकरी, शिक्षण, पर्यटनासाठी परदेशात जाणाऱ्यांना मोठा फायदा झाला आहे. पोलीस प्रशासनासह कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे वर्षभरात तब्बल १ लाख ३४ हजार अर्जदारांच्या पासपोर्टला हिरवा कंदील मिळाला आहे. अल्पावधीत नागरिकांच्या पासपोर्टचे व्हेरिफिकेशन होत असल्यामुळे अनेकांनी समाधान व्यक्त केले आहे.

पोलिसांकडून 'एम पासपोर्ट' ॲपद्वारे व्हेरिफिकेशन ऑनलाइन करण्यात आले आहे. त्यामुळे पासपोर्टच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये कमालीची घट झाली आहे. नोकरी, व्यवसाय, शिक्षणासह पर्यटनासाठी परदेशात जाणाऱ्या नागरिकांची संख्या दिवसेंदिवस वाढली आहे. त्यामुळे पासपोर्ट काढणाऱ्या नागरिकांच्या आलेखही उंचावला आहे. मागील काही वर्षांपूर्वी पोलिसांकडे पासपोर्ट पडताळणीसाठी (व्हेरिफिकेशन) अत्याधुनिक साधनांसह मनुष्यबळाचा अभाव होता. त्यामुळे अर्जदारांना पासपोर्टच्या पडताळणीसाठी तब्बल दोन महिन्यांवर कालावधी लागत होता. त्यामुळे अनेकांची परदेशवारी हुकली आहे. मात्र, मागील दोन वर्षांत पोलिसांकडून एम पासपोर्ट ॲपसह डिजिटल साधनांचा वापर करण्यात येत आहे. त्यामुळे पासपोर्ट पडताळणीचा कालावधी ६५ दिवसांवर आला होता. त्यानंतर पुणे पोलिसांच्या प्रयत्नांमुळे यावर्षीपासून

### पाच दिवसांत पडताळणी

अर्जदारांच्या पासपोर्टची पडताळणी अवघ्या पाच दिवसांवर आली आहे. नोकरी आणि शिक्षणासाठी परदेशात जाणाऱ्यांची संख्या वाढल्याने पासपोर्ट विभागाकडे अर्जदारांच्या रांगा लागत आहेत. संबंधित अर्ज व्हेरिफिकेशनसाठी पोलीस ठाण्यांकडे वर्ग करण्यात येतो. पोलिसांकडून प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत एम पासपोर्ट ॲपद्वारे अर्जदारांची माहिती नोंदवून पडताळणीला हिरवा कंदील दिला जात आहे.

पासपोर्ट पडताळणीला बुस्ट मिळाल्याने अर्जदारांनी समाधान व्यक्त केले आहे. पुणे पोलिसांकडे २०१४ मध्ये पासपोर्ट पडताळणीचे १ लाख १९ हजार अर्ज दाखल झाले होते. त्यावेळेस पडताळणीसाठी ५५ दिवसांचा कालावधी लागत होता, तर २०१५ मध्ये पोलिसांकडे १ लाख ४४ हजार ७१६ अर्ज आले होते. पडताळणीचा कालावधी वाढल्याने अर्जदारांना दोन महिन्यांची प्रतीक्षा करावी लागत होती. मात्र, डिसेंबर २०१६ मध्ये एम पासपोर्ट ॲपद्वारे पडताळणीची सुरुवात झाली. त्यामुळे कालावधी ३६ दिवसांपर्यंत आला. गतवर्षीपासून पासपोर्ट पडताळणी कालावधी फक्त ५ दिवसांवर आला आहे. पासपोर्ट विभागाने सर्व प्रक्रिया ऑनलाइन केल्यामुळे कागदपत्रांची तपासणी, फोटोच्या ठशांसह इतर प्रक्रिया तासाभरामध्ये पूर्ण होत आहे. गतवर्षीपासून पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांच्या मार्गदर्शनानुसार विशेष शाखा उपायुक्त मितेश घट्टे यांनी पासपोर्ट पडताळणीचा कालावधी कमी करण्यावर भर दिला होता. त्यानुसार प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत पासपोर्ट व्हेरिफिकेशनसाठी नियुक्त असलेल्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. त्यामुळे देशातील इतर राज्यांच्या तुलनेत पुण्यात अवघ्या पाच दिवसांत पासपोर्टची पडताळणी होत असल्याने नागरिकांकडून पोलिसांचे कौतुक केले जात आहे. अर्जदारांची संख्या वाढल्याने पडताळणीसाठी पोलिसांवरील ताण वाढला आहे. मात्र, टेक्नॉलॉजीमुळे अर्जदारांना पासपोर्ट पडताळणीसाठी चांगलाच फायदा झाला आहे.




**वार्षिक पासपोर्ट पडताळणी अहवाल**

| वर्ष | अर्ज | पडताळणी कालावधी |
|---|---|---|
| २०१३ | ९३ हजार ५३४ | ६१ दिवस |
| २०१४ | १ लाख १८ हजार ९३८ | ५५ दिवस |
| २०१५ | १ लाख ४४ हजार ७१६ | ६१ दिवस |
| २०१६ | १ लाख ६३ हजार ३८१ | ३६ दिवस |
| २०१७ | १ लाख ९० हजार २५४ | २९ दिवस |
| २०१८ | १ लाख ९७ हजार ८४१ | १० दिवस |
| २०१९ | १ लाख ३३ हजार ६७१ | ५ दिवस |

लोकमत – दि. २८ जानेवारी, २०२०

# अंध ज्येष्ठ नागरिक महिलेला पोलिसांनी मिळवून दिला न्याय

लोकमत न्यूज नेटवर्क



**पुणे :** त्यांनी अक्कलकोट येथे ८ एकर जमीन विकत घेतली होती; पण दोघेही ज्येष्ठ नागरिक असल्याने त्यांनी ही जमीन आपल्याच भाच्याला खंडाने कसण्यास दिली. पतीचे निधन झाल्यानंतर, त्यांची दोन मुले असूनही त्यांचा संभाळ करत नव्हती. हे लक्षात आल्यावर भाच्याने आपले रंग दाखविण्यास सुरुवात केली. त्या स्वत: अंध असल्याने भाचा त्यांच्याकडे पैसे मागू लागला. नाही तर जमीन आमच्या नावावर करून द्या, असे सांगून मानसिक त्रास देऊ लागला. या अंध ज्येष्ठ नागरिक महिला भरोसा सेलमध्ये आल्या. त्यांची व्यथा जाणून भरोसा सेलच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली चांदगुडे आणि महिला पोलीस नाईक पूनम वारसकर यांनी कायद्याचा धाक दाखविल्यावर हा भाचा सरळ झाला व त्याने जमिनीवरचा ताबा सोडून दिला. गेल्या ८ महिन्यांपासून सुरु असलेल्या त्रासातून या महिलेची सुटका होऊन तिला तिची जमीन परत मिळाली. या अंध महिलेने पोलीस आयुक्त डॉ. के व्यंकटेशम यांची भेट घेऊन पुणे पोलिसांचे आभार व्यक्त केले.

या महिलेच्या भाच्याबरोबर त्यांनी करारनामा करून ४ लाख ७५ हजार रुपये घेऊन ८ वर्षांच्या मुदतीने खंडाने दिली होती. पण त्यांचे भाच्याबरोबर भांडण झाले. तेव्हा मे २०१९ पासून त्याने दिलेल्या ४ लाख ७५ हजार रुपयांवर ५ टक्के महिना या हिशोबाने होत असलेली रक्कम द्या नाही तर ती जमीन आमच्या नावावर करून द्या, असे म्हणून त्रास देण्यास सुरुवात केली. या महिलेने ज्येष्ठ नागरिक कक्षात अर्ज केला. भरोसा सेलच्या वैशाली चांदगुडे यांनी दोघांना बोलावून त्यांचे समुपदेशन केले. तसेच त्या भाच्याला ज्येष्ठ नागरिक कायद्याच्या गांभीर्याबाबत त्या अनुषगाने होण्या शिक्षेबाबत समजावून सांगितले.

Sakal Times - 8 January, 2020

# City saw drop in serious crimes in 2019; crimes against women down by 14 pc

ST CORRESPONDENT
bureaus@sakaaltimes.com

**PUNE:** The annual crime report released by Pune city police on Tuesday shows less crimes in 2019 as compared with those in 2018, except murder.

Commissioner of Police Dr K Venkatesham released the crime-related data. Joint CP Ravindra Shisve, Additional Commissioner of Police (Crime) Ashok Morale, Additional CP (Traffic) Dr Sanjay Shinde, Additional CP Sunil Phulari, DCP (Crime) Bachchan Singh and other senior officers were present on the occasion.

As per the data, there were 9,552 FIRs for serious offences in 2018 which dropped to 8,677 in 2019, around nine per cent less. Except for murders, which saw a slight increase from 72 to 74 over this period, all other heads like attempt to murder, rape, molestation physical assault, robberies, dacoities, thefts, burglaries and vehicle thefts have shown small to significant reductions over the period.

Police officials said optimum use of manpower and and technology-oriented policing helped in reduction of crimes.

"In order to reduce crime in the city, 179 criminals were externed while action was taken against 18 under MPDA. Preventive action was taken against more than 1,500 people besides strict action against illegal businesses. We will analyse crime statistics to provide better services to citizens," said Police Commissioner Venkatesham.

DCP (Crime) Singh added, "Regular checking of criminals under Criminal Intensive Surveillance Project (CrISP), strong preventive action against repeated offenders were responsible for reduction of body and property offences."



**SOLVING CRIME:** Jt CP Ravindra Shisve (2nd from L) handed over recovered valuables to a complainant on Tuesday. The cops returned cash and other valuables worth Rs 2.02 crore.

## CONVICTION RATE IMPROVES

- The conviction rate of cases under the Indian Penal Code (IPC) improved from 39 per cent in 2018 to 64 per cent in 2019.

## FATAL ACCIDENTS REDUCED

- In 2018, there were 240 fatal accident and 253 accidental deaths, which reduced to 199 fatal accidents and 206 deaths in 2019. The number of grievous non-fatal accidents remained almost same from 466 to 463, the number of minor accidents reduced from 225 to 163. The drive against traffic rule violations resulted in reduction of accidents, officials said.
- To improve traffic issues, the police have identified 150 problems, five under each of the 30 traffic divisions, and have deputed teams from local police station and traffic division.

The registration of overall crimes against women have seen a reduction of 14 per cent, 752 to 643. The registration of rapes has reduced by six per cent from 236 to 224 and that of cases of molestation by 19 per cent from 516 to 419. Speaking about reduction in crimes against women, he said, "It was due to role of Women's Cell, Damini Pathak, Buddy Cop and reduction of technical offences."

The property offences have seen a reduction of overall 17 per cent from 4,526 to 3,760. There is also drop in chain snatching cases from 105 to 64.

प्रभात – दि. ८ जानेवारी, २०२०

# गुन्ह्यांचा आलेख घटला; शिक्षेचे प्रमाण वाढले

## गुन्हेगारांना शिक्षा होण्याच्या प्रमाणात ६४ टक्क्यांनी वाढ : इतर प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये ४१ टक्के घट

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ७ - पुणे शहरातील सर्वच प्रकारच्या गुन्हेगारीमध्ये सन २०१८ च्या तुलनेत २०१९ मध्ये घट झालेली दिसत आहे. तर मागील दहा वर्षांच्या तुलनेतही गुन्हेगारी घटल्याचे दिसत आहे. तर दुसरीकडे गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाणही मागील दहा वर्षांच्या तुलनेत तब्बल ६४ टक्के इतके वाढलेले दिसत आहे. खुनाच्या गुन्ह्यांचा अपवाद वगळता इतर सर्व प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये ४१ टक्के इतकी घट झाली आहे.

पुणे पोलिसांच्या वार्षिक गुन्हेगारी आढाव्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी पोलीस आयुक्त के. व्यंकटेशम्, सहायक पोलीस आयुक्त रवींद्र शिसवे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, पोलीस उपायुक्त (गुन्हे) बच्चन सिंग, सहायक पोलीस आयुक्त विजय चौधरी आदी उपस्थित होते.




> शहरातील वारंवार गुन्हे घडणाऱ्या ठिकाणांची (हॉट स्पॉट) माहिती काढली गेली. तेथे प्रतिबंधात्मक उपाययोजनांबरोबर गस्त वाढविण्यात आली. दुसरीकडे क्रिम्स योजनेअंतर्गत सराईत गुन्हेगारांची झाडाझडती वारंवार घेतली गेली. प्रतिबंधात्मक कारवाई, तडीपारी आदी कारवाई अंतर्गत गुन्हेगारांना शहराबाहेर काढले गेले. जे गुन्हेगार वारंवार गुन्हे करत आहेत, त्यांच्यावर लक्ष ठेवले गेले. पाबरोबरच दाखल झालेले गुन्हे उघडकीस आणण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न केले गेले. पोलीस अधिकारी आणि कर्मचारी फिल्डवर जास्त वेळ राहतील असे नियोजन केले. यासर्वांचा परिणाम म्हणून शहरातील सर्वच प्रकारचे गुन्हे घटलेले असल्याचे दिसत आहे.
>
> – के. व्यंकटेशम, पोलीस आयुक्त

सन २०१९ मध्ये ८६७७ गुन्हे दाखल झाले. या दाखल गुन्ह्यांच्या तपासाची टक्केवारी ६८.३ टक्के इतकी आहे. मागील दहा वर्षात ही टक्केवारी सरासरी ६०.३ टक्के इतकी होती. तर शरीराविरुद्धच्या गुन्ह्यांत १० टक्के, संपत्ती संदर्भातील गुन्ह्यात १७ टक्के आणि महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांत १४ टक्के घट झाली आहे. महिलांवरील गुन्ह्यांत १४ टक्के घट झाली आहे. महिलांसंबंधित गुन्हे २०१५-२०१६ मध्ये ७७५ दाखल होते, सन २०१८ मध्ये ७५२ तर सन २०१९ मध्ये ६४३ दाखल झाले आहेत. महिलांवरील गुन्ह्यांच्या वर्गवारीत बलात्कारात ६ टक्के आणि विनयभंगाच्या गुन्ह्यात १९ टक्के घट झाली आहे. तर गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण तब्बल ६४.०६ टक्के इतके आहे. हे प्रमाण मागील दहा वर्षांच्या तुलनेत ६४ टक्के वाढले आहे.

| गुन्ह्यांचे प्रकार | २०१८ | २०१९ |
|---|---|---|
| शरीराविरुद्धचे गुन्हे | १३७९ | १२३५ |
| खुनाचे गुन्हे | ७२ | ७४ |
| खुनाचा प्रयत्न | १२८ | १२१ |
| सोनसाखळी चोरी | १०५ | ६४ |
| वाहन चोरी | १९६६ | १६७८ |
| महिलांवरील गुन्हे | ७५२ | ६४३ |

### क्राईम ब्रँचची धास्ती

शहरातील अवैध धंदे बंद करण्यासाठी पोलीस आयुक्तांनी पोलीस ठाण्यांच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना आदेश दिले आहेत. तरीही काही पोलीस ठाण्यांच्या हद्दीत बेकायदा धंदे सुरू होते. ही बाब पोलीस आयुक्तांच्या लक्षात येताच, त्यांनी क्राईम ब्रँचची विविध पथके तयार करून पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बेकायदा धंद्यांवर धाडी टाकून कारवाया केल्या. ज्या पोलीस पोलीस ठाण्यांच्या हद्दीत हे धंदे होते, तेथील वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना समज देण्यात आली. तर काहींची बदली थेट पोलीस नियंत्रण कक्ष किंवा विशेष शाखेत केली गेली. यामुळे सध्या सर्वच पोलीस ठाण्यांच्या वरिष्ठांनी क्राईम ब्रँचची धास्ती घेतली आहे. एकवेळ आर्थिक रसद बंद झाली तरी चालेल मात्र अवैध धंदे आपल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत नको, अशी सावध भूमिका वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी घेतली आली आहे.

### २७ हजार २५० अर्जांचे निराकरण

सन २०१९ मध्ये विविध पोलीस ठाण्यात ३०३२९ तक्रार अर्ज दाखल झाले. त्यातील तब्बल २७२५० तक्रार अर्जांचे निराकरण केले गेले. तर भाग पाच आणि सहाच्या पेंडिंग केसेसपैकी १५२०९ केसेस निकालात काढल्या गेल्या. पोलिसांनी २२९६२ गुन्हेगारांना समन्स बजावले तर ३५२१ जणांना वॉरंट बजावले.

### सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढले

शहरात ऑनलाइनद्वारे अनेकांची फसवणूक करून गंडा घालण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. हे प्रमाण कमी करण्याचे आव्हान पोलिसांनासमोर उभे ठाकले आहे.

# शहरातील १२ पोलिसांना आयुक्तांचा 'सॅल्युट'

## विशेष कामगिरीमुळे केला सन्मान

पुणे, दि. ७ (प्रतिनिधी) – शहरातील विविध भागांत जिवाची बाजी लावून काम करणाऱ्या १२ पोलीस कर्मचाऱ्यांना पोलीस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांनी सॅल्युट केला. पोलीस ठाण्याअंतर्गत ड्युटीवर असताना नागरिकांच्या मदतीला धावून जाणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांचा आयुक्तालयात आज विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी पोलीस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, पोलीस आयुक्त डॉ. बच्चन सिंह यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

सन्मानार्थींमध्ये कोरेगाव पार्क वाहतूक विभागातील विनोद कायगुडे, राहुल ढमढेरे, वारजे पोलीस ठाण्यातील सद्दाम शेख, महेश बोयने, प्रतीक मोरे, समर्थ ठाण्यातील नीलेश सावळे, अनिल शिंदे, दत्तवाडी ठाण्यातील नीलम गायकवाड, येरवडा वाहतूक



विभागातील गणेश अशोक थोपटे, हडपसर ठाण्यातील सचिन बाबूराव हानवते, राजनंदिनी साळवे, भाग्यश्री वाघमारे यांचा समावेश आहे.

पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या घटनांवर कर्मचाऱ्यांनी तातडीने उपाययोजना करीत नागरिकांचा जीव वाचविला. त्यामध्ये कोरेगाव पार्कमध्ये हृदयविकाराचा झटका आलेल्या रिक्षाचालक अशोक वाडेकर यांना वाहतूक कर्मचारी विनोद कायगुडे यांनी ससून रुग्णालयात दाखल केले. आंबेगाव तलावात उडी मारलेल्या तरुणीचे प्राण सद्दाम शेख यांनी वाचविले. रास्ता पेठेत कुकरचा स्फोट होण्याच्या भीतीने गॅलरीतील महिलेचा आवाज ऐकून अनिल शिंदे यांनी मदत केली. दांडेकर पुलानजीक कालवा फुटल्याने पाण्यात अडकलेल्या लहान मुलाची नीलम गायकवाड यांनी पाठीवर घेऊन दोरीच्या साहाय्याने सुटका केली. मुसळधार पावसातही रात्री येरवडा वाहतूक विभागात नियमन करीत गणेश थोपटे यांनी ड्युटी केली. मुंढवा रस्त्यावर टेम्पोचालक मयूर जाधव यांना हृदयविकाराचा झटका आल्याने सचिन हानवते यांनी त्यांना रुग्णालयात दाखल केले. कर्वेनगरमधील माळीआळीत आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणाऱ्या तरुणाला महेश बोयाने, राजनंदिनी साळवे आणि प्रतीक मोरे यांनी परावृत्त केले. स्वारगेट बस स्थानकात एसटी बसमध्ये चढत असताना पडल्याने जखमी झालेल्या ज्येष्ठ नागरिकाला भाग्यश्री वाघमोरे यांनी खासगी रुग्णालयात दाखल करून प्राण वाचविले.

पुण्यनगरी – दि. १० जानेवारी, २०२०

# भरोसा सेलचे काम कौतुकास्पद

## कबडीपटू दीपिका जोसेफ, भरोसा सेलचा वर्धापन दिन उत्साहात

॥ पुणे : प्रतिनिधी

पोलीस आणि समुपदेशक हे स्वतःच्या घरातील अडीअडीचणीतून मार्ग काढीत समाजातील नागरिकांच्याही अडचणी, प्रश्न सोडवित असतात. त्यामुळे भरोसा सेलमधील पोलिसांचे काम निश्चितच कौतुकास्पद आहे भारतीय कबड्डी संघाच्या उपकर्णधार दिपिका जोसेफ यांनी सांगितले तसेच सेलमधील पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कामगिरीची प्रशंसा केली.



महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या तक्रारींचे निरसण करण्यासाठी स्थापन केलेल्या भरोसा सेलचा वर्धापन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त पोलीस आयुक्तालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे भारतीय कबड्डी संघाच्या उपकर्णधार दिपिका जोसेफ बोलत होत्या. यावेळी ज्येष्ठ लेखिका अरूणा ढेरे,पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

भरोसा सेल अंतर्गत काम करणाऱ्या महिला सहायता कक्षात २०१९ मध्ये एकुण ३ हजार ९९ तक्रारी अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी २ हजार २४८ तक्रारींची निर्गती करण्यात आली आहे तसेच उर्वरित ८५१ अर्जावर काम करण्यात येत आहे. ज्येष्ठ नागरिक कक्ष येथे ६१७ अर्ज आले आहेत. त्यापैकी ५६२ अर्ज निर्गती केली आहे. तसेच बाल सुरक्षा पथकातर्फे २ हजार ६९३ विधिसंघर्षित बालकांचे समुपदेशन करण्यात आले असल्याची माहिती भरोसा सेलच्या वतीने देण्यात आली. कार्यक्रमात विजय जगताप, ज्येष्ठ नागरिक सुलोचना बनसोडे तसेच विधिसंघर्षित बालकाच्या पित्याने आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमात शहरातील तीस पोलीस ठाण्यांना कार्यरत असलेल्या दामिनी टीमने कराटे तसेच छेडछाड, टिंगलटवाळी, बॅग लिफटींग अशा परिस्थितीत गुंडांचा सामना कसा करायचा याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. एस.एन.डी.टी कॉलेजच्या उपप्राचार्या कुलकर्णी यांनी लिहिलेल्या इम्पॅक्ट असेसमेंट ऑफ भरोसा सेल या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# ऑनलाइन फसवणुकीच्या पैशांची 'घरवापसी'

Shrikrishna.Kolhe
@timesgroup.com
Tweet : @ShrikrishnaMT

मटा विशेष

शुभवार्ता

> बहुतांश वेळा ग्राहकांकडून कोणतीही माहिती न घेता सायबर चोरट्यांकडून नागरिकांचे ऑनलाइन पैसे काढून घेतले जातात. सायबर चोरट्यांनी विविध बँका, वॉलेट अथवा इतर माध्यमातून पैसे हस्तांतर केलेले असतील, त्या वेळी सायबर सेलकडून संबंधितांना ई-मेल करून ते पैसे थांबविले जातात. फसवणुकीची रक्कम परत मिळवून ती संबंधितांना दिली जाते.
>
> – संभाजी कदम, पोलिस उपायुक्त, सायबर सेल



पुणे : सायबर चोरट्यांकडून वेगवेगळ्या क्लृप्त्या वापरून नागरिकांचे ऑनलाइन पैसे हडपण्याचे प्रकार वाढत असले, तरी ऑनलाइन फसवणूक झालेल्या नागरिकांचे पैसे परत मिळवून देण्यातही सायबर पोलिसांनी वर्षभरात चांगली कामगिरी केली आहे. गेल्या वर्षभरात ऑनलाइन फसवणूक झालेल्या पाचशे नागरिकांचे ११ कोटी ४० लाख रुपये परत केले आहेत.

सायबर चोरट्यांनी नागरिकांना वेगवेगळ्या माध्यमातून गंडा घातल्याचे दिसून आले. बहुतांश वेळा बँकेचा अधिकारी असल्याचे सांगून, खात्याची गोपनीय माहिती घेऊन पैसे दुसऱ्या खात्यावर वळविले जातात. त्यानंतर काही वेळातच ते पैसे काढून घेतले जातात. कधी-कधी ग्राहकांकडून कोणतीही माहिती न घेता कार्ड क्लोनिंग करून डेटा चोरला जातो. ग्राहकांच्या बँक खात्यातून पैसे काढले जात असल्याचे आढळून आले आहे. अशा वेगवेगळ्या पाचशे गुन्ह्यातील सायबर चोरट्यांनी हडपलेले तब्बल ११ कोटी ४० लाख रुपये सायबर पोलिसांनी वर्षभरात नागरिकांना परत मिळवून दिले आहेत. ओटीपी दिल्यानंतर अथवा सायबर चोरट्यांना पैसे पाठविल्यानंतर फसवणूक झाली, असे आढळून आल्यास पोलिसांकडे तक्रार दाखल करणाऱ्या नागरिकांचे पैसे परत करण्यात नागरिकांना यश आले आहे. सायबर पोलिसांनी जुलै महिन्यात सर्वाधिक १३७ नागरिकांचे तीन कोटी ८२ लाख १९ हजार रुपये परत केले आहेत. तर, एप्रिल महिन्यात सर्वात कमी नागरिक असले, तरी फसवणुकीचा आकडा मोठा होता.

| महिना | नागरिकांची संख्या | रक्कम |
|---|---|---|
| जानेवारी | ४० | २२,५४९७० |
| फेब्रुवारी | १७ | १५,२३,३८९ |
| मार्च | २५ | ७,७८१४९ |
| एप्रिल | ०७ | ४,१४,३४,९८८ |
| मे | ११ | ५,७६,९८४ |
| जून | ०८ | ४,२४,८५५ |
| जुलै | १३७ | ३, ८२,१९,३४५ |
| ऑगस्ट | ५५ | २२,४८,३७१ |
| सप्टेंबर | २६ | १०,७४,५७१ |
| ऑक्टोबर | ५८ | २३,७०,६८३ |
| नोव्हेंबर | ५१ | २८,८१,६१४ |
| डिसेंबर | ४१ | १,०१,६०,६१४ |